मेट्रो ३ प्रकल्पासाठी खोदकाम करण्यासाठी सक्षम प्राधिकाऱ्याची मंजुरी घेणे व स्वामित्वधनाच्या रकमेचा भरणा करण्यासंबंधी कार्यपध्दती निश्चित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन परिपत्रक क्रमांक : गौखनि १०/०३१७/प्र.क्र.१५६/ख
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
तारीख: ०५/०१/२०१८

<u>वाचा</u> : (१) महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, २०१३

(२) महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) (सुधारणा) नियम, २०१५

-: शासन परिपत्रक :-

केंद्र व राज्य शासनाच्या संयुक्त विद्यमाने मुंबईत राबविण्यात येणारा मेट्रो लाईन ३ (कुलाबा- बांद्रा- सीप्झ) हा ३२.५ कि.मी. लांबीचा संपूर्णत: भूयारी मार्ग प्रकल्प मुंबई मेट्रो रेल कार्पोरेशन मर्या. या संयुक्त उपक्रम कंपनीच्या माध्यमातून साकारण्यात येत आहे. सदर प्रकल्पासाठी करण्यात येणाऱ्या खोदकामामधून अंदाजे १०० लाख मेट्रीक टन उत्खननाचे परिमाण निविदेमध्ये निश्चित करण्यात आले आहे. सदर खोदकामासाठी व त्यातून निघणाऱ्या गौण खनिजाच्या वाहतुकीसाठी नियमानुसार स्वामित्वधन भरुन, सक्षम प्राधिकाऱ्याकडून परवानगी घेणे कंत्राटदारावर बंधनकारक आहे. सदर महत्वपूर्ण प्रकल्पाची कामे वेळेवर पूर्ण होण्याच्यादृष्टीने प्रकल्पांतर्गत खोदकामासाठी सक्षम प्राधिकाऱ्याची मंजुरी घेणे, स्वामित्वधनाची रक्कम भरणा करणे व वाहतूक करणे यासाठी सुलभ कार्यपध्दती निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यादृष्टीने या संदर्भात अवलंबावयाच्या कार्यपध्दतीविषयी पुढीलप्रमाणे दिशानिर्देश निर्गमित करण्यात येत आहेत :-

i) संबंधित प्रकल्प प्रस्तावक यांच्याकडून सदर प्रकल्पांतर्गत वर्षभरात करण्यात येणाऱ्या खोदकामामधून निघणाऱ्या गौण खनिजाचे संभाव्य परिमाण निश्चित करण्यात यावे. त्यानुसार संबंधित कंत्राटदाराकडून सदर प्रकल्पांतर्गत वर्षभरात करण्यात येणाऱ्या खोदकामासाठी परवानगी देण्याबाबत प्राप्त अर्जानुसार, जिल्हाधिकारी / अपर जिल्हाधिकारी मुंबई शहर व यथास्थिती मुंबई उपनगर यांनी वर्षभरात उत्खनन करण्यात येणाऱ्या गौणखनिजाच्या परिमाणासाठी विहित दराने स्वामित्वधनाची रक्कम भरुन घेऊन, १ वर्षाच्या कालावधीसाठी उत्खननाची परवानगी देण्यात यावी.

ii) प्रस्तुत प्रकल्पांतर्गत खोदकामामधून निघणारे गौण खनिज ठाणे व पालघर किंवा अन्य जिल्ह्यातील बंद पडलेल्या खदानींमध्ये टाकण्याचे नियोजित असल्याने, संबंधित कंत्राटदारांनी गौण खनिज कोठून कोठे नेणार आहे ती दोनही ठिकाणे व गौण खनिजाचे परिमाण याबाबतची सविस्तर माहिती संबंधित जिल्हाधिकारी / अपर जिल्हाधिकारी मुंबई शहर किंवा यथास्थिती मुंबई उपनगर यांना उपलब्ध करुन द्यावी. सदर माहितीनुसार

जिल्हाधिकारी / अपर जिल्हाधिकारी मुंबई शहर व यथास्थिती मुंबई उपनगर यांनी संबंधित कंत्राटदारास उत्खननासाठी परवानगी दिलेल्या परिमाणाएवढयाच गौण खनिजाच्या वाहतूकीसाठी दोन प्रतींमध्ये वाहतूक पास उपलब्ध करुन देण्यात याव्यात.

iii) वाहतूक पासमध्ये गौण खनिज उत्खननाचे ठिकाण, गौण खनिज नेण्यात येणारे ठिकाण, संबंधित ठेकेदाराचे नाव, वाहतूक करण्यात येणाऱ्या गौण खनिजाचे नाव, दिनांक व वेळ या बाबींचा समावेश करण्यात यावा. गौण खनिजाची वाहतूक करताना मूळ वाहतूक पास वाहनासोबत ठेवण्यात यावा व गौण खनिज नमूद ठिकाणी उतरुन घेतल्यानंतर सदर वाहतूक पास संबंधित मुंबई मेट्रो रेल कार्पोरेशन लिमिटेड यांचे प्रतिनिधी यांनी ताब्यात घेऊन रद्द करावा व संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठविण्यात यावा. वाहतुक पास पुस्तक संपुष्टात आल्यानंतर, अशी पुस्तके (दुय्यम प्रती) संबंधित जिल्हाधिकारी / अपर जिल्हाधिकारी कार्यालयात जमा करण्यात यावीत.

iv) सदर प्रकल्पांतर्गत पुर्नभरणीच्या कामाकरीता बाहेर नेलेल्या गौणखनिजापैकी काही गौण खनिज पुन्हा आणावे लागणार असल्यास सदर गौण खनिजावर पूर्वी स्वामित्वधन भरणा करण्यात आला असल्याने, संबंधित कंत्राटदारांनी असे गौण खनिज कोठून कोठे नेणार आहे ती दोनही ठिकाणे व गौण खनिजाचे परिमाण याबाबतची सविस्तर माहिती संबंधित जिल्हाधिकारी यांना उपलब्ध करुन द्यावी. सदर माहितीनुसार संबंधित जिल्हाधिकारी / अपर जिल्हाधिकारी यांनी स्वामित्वधन न आकारता संबंधित कंत्राटदारास अशा गौण खनिजाच्या वाहतूकीसाठी दोन प्रतींमध्ये वाहतूक पास उपलब्ध करुन देण्यात याव्यात. अशा वाहतुक पास देताना त्यांच्या जिल्ह्यात ठेवण्यात आलेल्या गौण खनिजाच्या मर्यादेतच देण्यात याव्यात. अशा वाहतूक पासेसमध्ये गौण खनिज साठवण्यात आलेले ठिकाण, गौण खनिज नेण्यात येणारे ठिकाण, संबंधित ठेकेदाराचे नाव, वाहतूक करण्यात येणाऱ्या गौण खनिजाचे नाव, दिनांक व वेळ या बाबींचा समावेश करण्यात यावा. गौण खनिजाची वाहतूक करताना मूळ वाहतूक पास वाहनांसोबत ठेवण्यात यावा व गौण खनिज कार्यस्थळी उतरुन घेतल्यानंतर सदर वाहतूक पास मुंबई मेट्रो रेल कार्पोरेशन लिमिटेड यांचे प्रतिनिधी यांनी ताब्यात घेऊन रद्द करावा. वाहतुक पास पुस्तक संपुष्टात आल्यानंतर, अशी पुस्तके (दुय्यम प्रती) संबंधित जिल्हाधिकारी / अपर जिल्हाधिकारी कार्यालयात जमा करण्यात यावीत.

v) संबंधित उपविभागीय अधिकारी, तहसिलदार व क्षेत्रीय महसूल यंत्रणेने अशा तात्पुरत्या उत्खनन परवान्यांच्या आधारे होणाऱ्या गौण खनिजाच्या उत्खननाच्या परिमाणाबाबत वेळोवेळी तपासणी करावी. मात्र, मंजुरीपेक्षा जास्त उत्खनन झाल्याचे दृष्टोत्पत्तीस आल्यास संबंधित क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी प्रकल्पाचे काम न थांबविता त्यांच्या स्तरावर नियमानुसार संबंधित कंत्राटदारास कारवाईची नोटीस देवून ही बाब त्याचवेळी जिल्हाधिकारी / अपर जिल्हाधिकारी यांच्या निदर्शनास आणावी.

vi) जिल्हाधिकारी / अपर जिल्हाधिकारी यांनी उपविभागीय अधिकारी / तहसिलदार /संबंधित क्षेत्रीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त अहवालाची छाननी करुन, कंत्राटदाराची कृती मेट्रो रेल कार्पोरेशन लिमिटेडच्या निदर्शनास लेखी आणून, जास्तीच्या गौण खनिज उत्खननापोटी वाढीव स्वामित्वधनाची रक्कम ३० दिवसाच्या आत शासनजमा करण्याबाबत संबंधित ठेकेदारास त्याचवेळी कळविण्याची व्यवस्था करावी.

vii) जास्तीच्या गौण खनिजाच्या उत्खननाची बाब मुंबई मेट्रो रेल कार्पोरेशन लिमिटेडच्या निदर्शनास आणून दिल्यापासून ३० दिवसाच्या आत संबंधित ठेकेदाराने गौण खनिजाच्या वाढीव उत्खननापोटी स्वामित्वधनाची रक्कम शासनजमा केल्यास एक विशेष बाब म्हणून त्यांच्याविरुध्द महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील कलम ४८ (७) नुसार दंडात्मक कारवाई करण्यात येऊ नये. मात्र, संबंधित ठेकेदाराने ३० दिवसाच्या आत गौण खनिजाच्या वाढीव उत्खननापोटी स्वामित्वधनाची रक्कम शासनजमा न केल्यास तो दंडात्मक कारवाईस पात्र राहील.

२. सदर प्रकल्पाची कामे वेळेवर पूर्ण होण्यासाठी कोणत्याही प्रकारे अडथळा येणार नाही, याबाबतची दक्षता सर्व क्षेत्रीय महसूल अधिकाऱ्यांनी कटाक्षाने घ्यावी.

३. उपरोक्त निर्देश हे मेट्रो -३ या प्रकल्पाच्या कामासंबंधीच लागू राहतील.

४. सदर परिपत्रक वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्रमांक २५१/२०१७/व्यय-९, दिनांक १६/०८/२०१७ नुसार दिलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहेत.

५. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१८०१०५१७३३५६६४१९ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajendra Kshirsagar

Digitally signed by Rajendra Kshirsagar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue And Forest Dept, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=3e673df1a1f6243d932fcb8679fc8cd85d90c61495ae8b4592f8dcc5b8a851a8, cn=Rajendra Kshirsagar
Date: 2018.01.05 17:38:57 +05'30'

(राजेंद्र क्षीरसागर)
शासनाचे सह सचिव

प्रत,

१) मा.मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
२) मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
३) मा. राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
४) सर्व मा.मंत्री / मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
५) अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
६) प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

७) सर्व मंत्रालयीन विभाग.

८) विभागीय आयुक्त कोंकण विभाग, मुंबई.

९) जिल्हाधिकारी मुंबई शहर/मुंबई उपनगर जिल्हा/ठाणे /पालघर.

१०) सर्व कार्यासने, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

११) निवडनस्ती "ख" कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुबई ४०० ०३२.